महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव**
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र.शावैमवरुधा/स्वी.स./ 248 /२०२६ दि:-11 /०२/२०२६

**कार्यालयीन आदेश :-**

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव परिसरातील स्वच्छतेच्या अनुषंगाने समिती गठीत करणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक: विसता २२२४/प्र.क्र.१६९/२०२४/वैसेवा-१ दि.१०/०७/२०२४.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने महाविद्यालय व रुग्णालयातील काही प्रमाणातील अस्वच्छतेमुळे रुग्णांना व सामान्य जनतेस नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच शा.वै.म. व रुग्णालयाच्या अंतर्गत येणाऱ्या स्त्री-रुग्णालय, धाराशिव येथील संपूर्ण परिसर स्वच्छतेच्या अनुषंगाने खालील समितीचे गठन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अभिजीत आचार्य | सहयोगी प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग, शा.वै.म.व रु., धाराशिव | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रविण डुमणे | उप वैद्यकीय अधीक्षक तथा सहाय्यक प्राध्यापक, क्षयरोग व उरोरोगशास्त्र विभाग, शा.वै.म.व रु., धाराशिव | सदस्य सचिव |
| ३. | डॉ. किरण देशमुख | सहाय्यक प्राध्यापक, स्त्री-रोग व प्रसूतीशास्त्र, शा.वै.म.व रु., धाराशिव | सदस्य |
| ४. | डॉ. मंगेश पाटील | वैद्यकीय अधिकारी, न्यायवैद्यकशास्त्र विभाग, शा.वै.म. व रु., धाराशिव | सदस्य |
| ५. | श्री. देवानंद मोहाळे | प्रशासकीय अधिकारी तथा वरीष्ठ सहाय्यक, शा.वै.म.व रु., धाराशिव | सदस्य |
| ६. | श्री. राहुल बनसोडे | कार्यालयीन अधिक्षक, शा.वै.म., धाराशिव | सदस्य |
| ७. | श्री. यशवंत चोरमल्ले | वरीष्ठ लिपीक, शा.वै.म., धाराशिव | सहाय्यक सदस्य |
| ८. | श्री. पुरुषोत्तम दांगट | वरीष्ठ लिपीक, शा.वै.म. व रु., धाराशिव | सहाय्यक सदस्य |
| ९. | श्री. समाधान राठोड | स्वच्छता निरीक्षक (कंत्राटी), शा.वै.म. व रु., धाराशिव | |
| १०. | श्री. सहदेव सगर | स्वच्छता निरीक्षक (कंत्राटी), शा.वै.म. व रु., धाराशिव | |

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील स्वच्छतेचा दर्जा सुधारण्यासाठी संदर्भीय शासन परिपत्रकान्वये खालील प्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

१) महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील संपूर्ण कक्ष व कक्षातील खोल्यांची, पॅसेज, पाय-या व लिफ्टची तसेच विद्यार्थी वसतीगृहांची साफसफाई करणे, आंतररुग्ण व बाहयरुग्ण विभागातील रुग्णास वापरली जाणारी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजासाठी वापरली जाणारी सर्व साहित्य व मशिनरीची नियमित स्वच्छता ठेवणे, विद्यार्थ्यांच्या वसतीगृहा जवळील परिसर स्वच्छ राहिल याची समितीने दक्षता घ्यावी.

२) स्वच्छता निरीक्षकांमार्फत अतिदक्षता विभाग, आंतररुग्ण व बाहयरुग्ण विभाग तसेच आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील स्वछता सेवेच्या दर्जात सुधारणा करण्याकरीता परिसराची नियमित पाहणी करुन आवश्यक त्या सूचना संबंधित कर्मचा-यांना वेळोवेळी द्याव्यात.

४) संस्थेतील स्वच्छतेच्या बाबतीत कोणतेही निवेदन तक्रार प्राप्त होणार नाही याची दक्षता समितीने घ्यावी.

वरील देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

उपरोक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, शासनामार्फत आणि वरीष्ठ कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या सूचना व शासन निर्णयांचे पालन करुन पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

डॉ. शैलेंद्र द. चौहान,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
धाराशिव.

प्रति :-

वरील सर्व संबंधितांना (मार्फत-विभागप्रमुख)

प्रत :-

१. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, धाराशिव.
२. वैद्यकीय अधिक्षक तथा अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक, शा.वै.म. व रु., धाराशिव.
३. सर्व विभागप्रमुख, शा.वै.म., धाराशिव.
४. वैद्यकीय अधिक्षक, स्त्री-रुग्णालय, धाराशिव.
५. मुख्य प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म., धाराशिव.
६. प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म., धाराशिव.
७. कार्यालयीन अधिक्षक, शा.वै.म. व रु., धाराशिव.
८. अधिसेविका, जिल्हा रुग्णालय, धाराशिव.
९. सहाय्यक अधिसेविका, स्त्री-रुग्णालय, धाराशिव.
१०. कुलमंत्री, सर्व वसतिगृहे, शा.वै.म., धाराशिव.

राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील स्वच्छतेच्या दर्जात सुधारणा करणेबाबत .

महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्रमांक : विसता २२२४/प्र.क्र.१६९/२०२४/वैसेवा-१

गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ००१

तारीख: १०.०७.२०२४

परिपत्रक

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व सलंग्नित रुग्णालयातील काही प्रमाणातील अस्वच्छतेमुळे रुग्णांना व सामान्य जनतेस नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब विचारात घेता, राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व सलंग्नित रुग्णालयातील स्वच्छतेच्या दर्जात सुधारणा करण्याकरीता संस्थाप्रमुख यांना खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) महाविद्यालय व सलंग्नित रुग्णालयातील संपुर्ण कक्ष व कक्षातील खोल्यांची, पॅसेज, पायऱ्या व लिफ्टची तसेच विद्यार्थी वसतीगृहांची साफसफाई करणे, आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभागातील रुग्णास वापरली जाणारी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजासाठी वापरली जाणारी सर्व साहित्य व मशिनरीची नियमित स्वच्छता ठेवणे, विद्यार्थ्यांच्या वसतीगृहा जवळील परिसर स्वच्छ राहिल यांची संस्थाप्रमुख यांनी दक्षता घ्यावी.

२) स्वच्छता निरिक्षकांमार्फत अतिदक्षता विभाग, आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभाग तसेच आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

३) शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व सलंग्नित रुग्णालयातील संस्थाप्रमुख म्हणून अधिष्ठाता यांनी स्वच्छता सेवेच्या दर्जात सुधारणा करण्याकरीता वैयक्तिक लक्ष घालून व परिसराची नियमित पहाणी करून आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना वेळोवेळी द्याव्यात.

४) रुग्णांकडून / रुग्णांच्या नातेवाईकांकडून संस्थेतील स्वच्छतेच्या बाबतीत कोणतेही निवेदन/तक्रार प्राप्त होणार नाही याची दक्षता रुग्णालय प्रशासनाने घ्यावी.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

२. उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे पालन होईल याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने संबंधित अधिष्ठाता यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आपला,

(शंकर जाधव)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय.